# IKEA ...what an idea!

नवी मुंबईतील तुर्भेजवळ IKEA या बहुराष्ट्रीय कंपनीने एक भलं मोठं showroom काढलंय. जाता येता गाडीतून दिसायचं पण कधी जाण्याचा योग आला नाही. सगळेजण म्हणायचे छान आहे. एकदा मुद्दाम वेळ काढला आणि भेट दिली. केवढा अवाढव्य कारभार आहे! त्याला showroom म्हणणं खरंच चुकीचं आहे. तो furniture चा अवाढव्य मॉल आहे. सुमारे ८०,००० चौरस फूट क्षेत्रफळ असलेला हा अवाढव्य मॉल आहे. IKEA कंपनीचं एक कायमस्वरूपी प्रदर्शन म्हणायला हवं. मध्यंतरी कोरोनाच्या कालावधीत येथे मर्यादित स्वरूपात प्रवेश होता, मात्र कोरोनाची लाट ओसरल्यानंतर पुन्हा सगळ्या ग्राहकांना खुले केले आहे.

IKEA च्या showroom बाबत सविस्तर बोलताना त्याची थोडी पार्श्वभूमी समजून घ्यायला हवी. IKEA ही स्वीडिश कंपनी. Ingvar Kamprad Elmtayd Agunnarud ह्या नावाचा, IKEA हा शॉर्ट फॉर्म. ह्यात त्या मूळ संस्थापकाच नाव आणि त्याच्या मूळ राहत्या खेड्याचा उल्लेख समाविष्ट आहे. 'Creating a better everyday life for many people' हे कंपनीचं ब्रीदवाक्य. बहुजन समाजासाठी उत्तम दैनंदिन आयुष्य बनवणे, जेणेकरून त्यांचं जीवन सुखकर आणि आरामदायी होईल.

IKEA शोरूममध्ये प्रवेश करताना आपण जणू एकेका दालनात प्रवेश करतो. इथे घरगुती वापरासाठी लागणारे साहित्य, furniture, साहित्य आणि इतर वस्तू अश्या रीतीने रचलेल्या आहेत की तो फक्त मॉल अथवा शोरूम वाटत नाही तर आपण एखाद्या फॅक्टरीमध्ये असल्याचा भास होतो. इथे फिरताना कोणी salesman सभोवताली फिरताना दिसत नाही किंबहुना कोणी salesman त्या प्रॉडक्ट बाबत मखलाशी करायला येत नाही अथवा तुम्हाला एखादं प्रॉडक्ट घेण्यासाठी उद्दीपित करत नाही. तुम्ही तुमच्या सवडीने सगळं बघत असता. तुमच्या कुटुंबियांसोबत मनसोक्त चर्चा करत असता. तुमच्या डोक्यातील घराच्या सजावटीची एखादी मूलभूत कल्पना असेल त्या कल्पनेला भरारी देऊ शकता. इथे प्रॉडक्ट फक्त ठेवलेले नसून तुमच्या घराची जणू रचना तयार केलेली आहे. उदाहरण द्यायचे झाले तर one bedroom hall kitchen ह्या क्षेत्रफळात हॉल मधील सोफा, खुर्च्या, लहान dining सोबत kitchen मधले modular kitchen पासून china glass आणि स्टील च्या साहित्यासह kitchen सजवलेले दिसते, तीच गोष्ट bed रूम ची. तिथे उपलब्ध असलेले furniture आणि इतर साहित्य त्या उपलब्ध क्षेत्रफळात इतके सुंदर रीतीने रचलेले असते की ग्राहक जणू आपल्या घरात असल्याचा आनंद घेऊ शकतो. हे बघत असताना तो त्या bed वर झोपू शकतो, खुर्चीत आणि सोफा येथे बसून त्याचा आनंद घेऊ शकतो. तीच गोष्ट मोठ्या क्षेत्रफळाच्या फ्लॅट बाबत पण. हे करत असताना पुन्हा

कोणी salesman तुम्हाला disturb करत नाही अथवा उगाच 'May I help you' च्या नावाखाली तुमच्या डोक्यात त्याच्या कल्पना मांडत नाही. हे स्वातंत्र्य आणि आपल्या गरजेनुसार  कल्पनेला दिलेला वाव, हे IKEA showroom चे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

IKEA showroom पाहताना बऱ्याच नाविन्यपूर्ण गोष्टी पहाता येतात आणि या showroom बाबत वेगळेपण जपणाऱ्या अनेक गोष्टी अधोरखीत होतात.
जसे,
१. वेगळेपण जपणारी designs आणि आधुनिक काळाशी मिळतेजुळते वाटेल अशी product designs, जेणेकरून तरुण पिढी आकर्षित होते.
२. साधी आणि सोप्या पद्धतीची product designस. ज्याला आपलेपण वाटतं, उगाच काही बोजडपणा नाही. त्या product design मध्ये Simple Geometry अधोरिखीत होते. त्यामुळे त्याला एक decency वाटते.
३. ग्राहकाला सहज आवडेल असे वातावरण. Customer friendly environment. उगाच भपकेबाजपणा नाही, Don't touch सारखे आगाऊ उपदेश नाहीत.
४. पर्यावरण पूरक असे प्रॉडक्ट्स. Environment friendly products.
५. किफायतशीर किंमती. येथील फर्निचर आणि इतर गृहपयोगी वस्तूंच्या किंमती अगदी वाजवी वाटतात. त्यामुळे ग्राहक आकर्षित होतो.
६. Do it yourself. आपल्या गरजेनुसार आणि सोयीनुसार फर्निचर आणि वस्तूंची निवड करण्याचे स्वातंत्र्य ग्राहकास आहे. किंबहुना हाच त्यांचा Unique Selling Proposition (USP).
७. सहकुटुंब सहपरिवार एकत्र येऊन तेथे चर्चा करू शकतात. Togetherness हे जणू वेगळेपण.
८. ग्राहकास विचार करण्याचे फक्त स्वातंत्र्य नसून स्वतः विचार करायला उद्दिपित करतात. ग्राहक त्याच्या डोक्यातील मूळ कल्पनांना अधिक बळकटी देऊ शकतो.
'Cultivate Idea instead of attacking customers for selling of the products.'
९. येथील फर्निचरसाठी सहज उपलब्ध असलेल्या लाकडाचा वापर केलेला आहे, हे लाकूड वजनास हलकं आणि त्यासाठी लागणारे बोर्ड हे पुनर्वापर केलेल्या टाकाऊ लाकडाचे असतात. त्यामुळे हे furniture पर्यावरण पूरक असे आहेत.
१०. ग्राहकांना furniture जोडणी साठी प्रोत्साहित केले जाते, जेणेकरून ग्राहक घरी जाऊन फर्निचरची जोडणी करू शकेल. त्यामुळे लागणारे अतिरिक्त मनुष्यबळ कमी होते आणि पर्यायाने वस्तूची किंमत कमी होते.
११. फर्निचर आणि वस्तू अश्या सुबक पद्धतीने मांडलेल्या असतात जणू ग्राहकाला आपण घरीच असल्याचा भास होतो.
१२. ग्राहक वस्तू आणि फर्निचर ह्याचा स्वतः अनुभव घेऊ शकतो.

१३. अतिरिक्त salesman ची उगाच ढवळाढवळ नाही त्यामुळे ग्राहकास स्वतःची एक स्पेस मिळते.
१४. ही विस्तीर्ण महाकाय showroom बघितल्यानंतर साहजिकच ग्राहक थकलेले असणार, त्यांच्यासाठी उत्तम खानपान सेवा उपलब्ध आहे. त्यात पुरेसे खाद्य आणि पेये उपलब्ध असतात आणि तेही माफक दरात. 'you can't do business with someone on empty stomach. It's hard to do business with hungry customers.'
१५. येथील प्रॉडक्ट 'minimalistic life style' नुसार design केलेले असल्याने, तरुण पिढीला भावतात आणि आकर्षित करतात.
१६. सगळ्यात महत्वाचं म्हणजे सगळे प्रॉडक्ट्स वजनाने हलके, हाताळण्यास सोपे, जेणेकरून घरातील दोन व्यक्तींना सहज हलवता येतील असे आहेत त्यामुळे भविष्यातील 'nuclear family' डोळ्यापुढे ठेवून ह्या प्रॉडक्टची design आहे.

ही वरील गुणवैशिष्ट्ये असल्याने IKEA च्या Mall ला खूप गर्दी असते आणि काळानुरूप त्याला खूप लोकप्रियता आणि जनाश्रय मिळायची शक्यता वाटते परंतु काही कमतरता पण आधोरिखित होतात जसे ह्या वस्तूंना टिकाऊपणा नाही. Durability is main concern. आजही एका शहरात कायम वास्तव्यास असलेले लोक, जसे व्यावसायिक लोक टिकाऊ फर्निचरला जास्त प्राधान्य देतील. तसेच अशा readymade furniture मुळे पारंपारिक सुतारकाम करणारे कारागीर बेरोजगार होण्याची शक्यता जास्त. त्या कौशल्यप्राप्त लोकांनी गुजराण कशी करावी हा काळानुरूप भेडसावणारा सामाजिक प्रश्न आहे.

पण तरीही अश्या नवीन संकल्पनेचे स्वागत करायला हवे. त्यामुळेच IKEA बघितल्यावर सहज वाटते, 'what an idea!'

**- मनोज कुरुंभटी**